# Maniben Nanavati Women's College
# Vallabhbhai Rd. Vile Parle (W) Mumbai-400056.

## Government Scholarship:-2025-26

## 1)Post Matric (Natioanl Scholarship)

*********************************************************

**I – AICTE Pragati Scholarship**

**II – AICTE Saksham Scholarship**

**II – AICTE Sawanath Scholarship**

**1)Post Matric (Natioanl Scholarship) :-Documents Require : following:-**

1) Xerox of XII$^{th}$ OR Last Pass Marksheet.
2) Income Certificate (Tahashildar Dakhala) **OR** Form No.16
3) Ration Card Xerox Copy.
4) Students A/C No. of Any Natiionalise Bank & Xerox copy of Pass Book.
5) Aadhar Card (UID) Xerox Copy.
6) Admission Fee Receipt

**Note:- All Information & Online Procedure is given On the Website:-** scholarships.gov.in (www.scholarships.gov.in)

** **One Student get One Scholarship in One Academic Year.**

Dr. (Mrs.) Rajshree P. Trivedi
Principal
Maniben Nanavati Women's College,
Vile Parle (West), Mumbai-400 056.

# Maniben Nanavati Women's College
# Vallabhbhai Rd. Vile Parle (W) Mumbai-400056.

## Government Scholarship:-2025-26

*****************************************************

## 1) MAHADBT (Maharashtra Govt.)

**MahaDBT Portal-Scholarship (Maharashtra Govt.)( Rajshri Chhatrapati Shah Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojana)**

1) Xerox of XII$^{th}$ OR Last Pass Marksheet.
2) SC / ST/ VJNT/SBC/OBC. Caste Certificate
3) Income Certificate (Tahashildar Dakhala) and Domicile Compulsory
4) Ration Card Xerox Copy.
5) Students A/C No. of Any Natiionalise Bank & Xerox copy of Pass Book.
9) If Residing ahead Dahisar ( District change certificate required).
10) Aadhar Card (UID) Xerox Copy.
11) Admission Fee Receipt

**Note:- All Information & Online Procedure is given On the Website:- www.mahadbtmahait.gov.in** **http://mahadbtmahait.gov.in (www.scholarships.gov.in)**

** **One Student get One Scholarship in One Academic Year.**

RPTrivedi

Dr. (Mrs.) Rajshree P. Trivedi
Principal
Maniben Nanavati Women's College,
Vile Parle (West), Mumbai-400 056.

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

**एलफिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

Email : jdhemumbai@gmail.com फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५६६००

जा.क्र. ससं/उशि/मुंवि/महाडीबीटी/२०२५-२६/ ६२१८ दिनांक : 01/12/2025

**परिपत्रक**

प्रति,

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
   सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित,
   विना अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
   मुंबई - ४०० ०३२.

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
   चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ,
   मुंबई.

**विषय : दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविणेबाबत.**

संदर्भ : क्र.उशिसं/शिष्य-२०२५-२६/डी.बी.टी./ई-क्र.६१५६१६९३/दि.२५.११.२०२४ चे संचालनालयाचे परिपत्रक.

उपरेक्त विषयास अनुसरुन संचालनालयाचे संदर्भीय परिपत्रकानुसार दि. २८ नोव्हेंबर २०२५ ते १२ डिसेंबर २०२५ याकालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवडा राबविण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदर परिपत्रकाच्या प्रत अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

तसेच शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीय बोर्डवर प्रसिद्ध रिण्यात यावेत.

(डॉ. रुपेश राऊत)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

D:\KHARAT\Maha DBT/college

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

क्र.उशिसं/शिष्य-२०२५-२६/डीबीटी/ दि. /११/२०२५

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय : दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविणेबाबत.**

संचालनालयामध्ये ऑनलाईन घेण्यात आलेल्या दि. २०/११/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज फार कमी प्रमाणात प्राप्त होत असलेबाबत चर्चा करण्यात आली. तथापि, अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे तसेच अर्जांची संख्या वाढविणेसाठी विशेष उपाययोजना करणेबाबत ठरविण्यात आले.

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. सन २०२५-२६ करीतां महाडीबीटी पोर्टलवरुन उच्चशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०.०६.२०२५ पासून ऑनलाईनपध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणा-या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ३ | एकलव्यआर्थिक सहाय्य योजना |
| ४ | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ६ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्र वृत्ती |
| ७ | शासकीय संशोधनअधिछात्र वृत्ती |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ९ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिक शास्त्रविषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |

सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे दि.०७.०७.२०२५ व दि.२५.०९.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमुद संकेतस्थळांवर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. तसेच फी मंजूरी बाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे. तथापि, अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणे करीता दि. **२८.११.२०२५** ते दि. **१२.१२.२०२५** या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविण्यात यावा. याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विद्यार्थ्यांनी करावयाची पूर्वतयारी –**

१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योनजनेचे अर्ज भरताना साधारणतः उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.

२ शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे.त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

३ शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

४ विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

५ ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner

**महाविद्यालयांनी करावयाची पूर्वतयारी –**

१ महाविद्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयातर्फे संगणक, प्रिंटर, इंटरनेट इत्यादी सेवा नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावे.

२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार /उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावेत.

३ महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली ( अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.)

४ महाविद्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यांनी / महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject / Sent Back) करावी. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर ( Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.

५ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने ( Approved / Reject / send Back) कार्यवाही करावी.

६ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबधीत विभागाकडे विहीत कालमर्यादेत सादर करावीत.

७ महाविद्यालय स्तरावर **दि.२८.११.२०२५ ते दि.१२.१२.२०२५** **"विशेष पंधरवाडा"**म्हणून साजरा करण्यात यावा. सदर पंधरवाडा मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

तसेच संबधित विभागीय सहसंचालकांनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड असणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज संचालनालयाच्या (DHE Login) वर मंजूरीसाठी तात्काळ पाठविण्यात यावेत.

८ दि. २८.११.२०२५ ते दि. १२.१२.२०२५ या पंधरवाडयामध्ये विद्यार्थ्यांना, राज्यशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

तसेच सदर विशेष पंधरवाडयाचा संकलीत अहवाल दर चार दिवसांनी संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 25-11-2025 19:02:22

(डॉ शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रत - १. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

२. कुल सचिव, सर्व अकृषि विद्यापीठे - आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालये/ संस्था यांना तात्काळ कळविण्यात यावे.

३. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, कायमविना अनुदानित महाविद्यालय/ संस्था.

Scanned with OKEN Scanner